जा.क्र.गुअवि/रागुअकें/डीजीपी-आयजीपी परिषद/ ९२९ /२०१९
अपर पोलीस महासंचालक,
गुन्हे अन्वेषण विभाग, म.राज्य., पुणे यांचे कार्यालय
दिनांक -१६/०५/२०१९

विषय - प्रेसनोट प्रसिध्द होणेबाबत

मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडुन दर महिन्याला 1.गुणात्मक अन्वेषणासाठी सर्वोत्कृष्ट प्रयत्न 2.उत्कृष्ट अपराधसिध्दी 3. सर्वोत्कृष्ट मालमत्ता हस्तगत या गुन्हयांची निवड करण्यात येते व संबंधीत गुन्हयाचे तपासी अधिकारी व कर्मचारी यांना प्रोत्साहित करण्याकरिता बक्षीस देण्यात येते. सदर गुन्हयांचा मुददेनिहाय सारांश प्रसार माध्यमांमध्ये तसेच सोशल मिडीयाव्दारे प्रसिध्द होणे आवश्यक आहे. जेणेकरुन जनतेचा तपास यंत्रणेवरिल विश्वास दृढ होण्यास मदत होईल.

मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडुन देण्यात येणाऱ्या उत्कृष्ट अपराधसिध्दी या बक्षीसाकरिता निवड करण्यात आलेल्या औरंगाबाद शहर, जवाहरनगर पो.स्टे. गुरनं. 74/2017, भादवि कलम 364-A,302,201,120B गुन्हयातील दोन्ही आरोपींना मा.न्यायालयाने आजन्म सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे. तरी गुन्हयाचा तपास व आरोपींना झालेली शिक्षा याबाबत वर्तमानपत्रात प्रसिध्दी देण्यात यावी.
सोबत- प्रेसनोट

(दत्तात्रय मंडलिक)
विशेष पोलीस महानिरीक्षक, रागुअकें,
गुअवि.,म.रा.,पुणे.

प्रति

**प्रेसनोट** दिनांक १६/०५/२०१९

पोलीस खात्यातील अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या उत्कृष्ट तपासामुळे गुन्हे उघडकीस येतात तसेच गुन्हे दोषसिध्द होवुन आरोपीस शिक्षा होते. अशा गुन्हयांचा मुददेनिहाय सारांश प्रसार माध्यमांमध्ये तसेच सोशल मिडीयाव्दारे प्रसिध्द होणे आवश्यक आहे.

पोलीस खात्यातील अधिकारी व कर्मचारी यांना प्रोत्साहित करण्याकरिता उत्कृष्ट कर्तव्य पार पाडणारे अधिकारी/ कर्मचारी यांची १.गुणात्मक अन्वेषणासाठी सर्वोत्कृष्ट प्रयत्न २.उत्कृष्ट अपराधसिध्दी ३. सर्वोत्कृष्ट मालमत्ता हस्तगत या बक्षीसासाठी प्रत्येक महिन्याला निवड करण्यात येते गुन्हे अन्वेषण विभागाकडुन उत्कृष्ट अपराधसिध्दी या बक्षीसाकरिता निवड झालेला औरंगाबाद शहर, जवाहरनगर पो.स्टे. गुरनं. ७४/२०१७,भादवि कलम ३६४-A,३०२,२०१,१२०B या गुन्हयातील दोन्ही आरोपींना मा.न्यायालयाने आजन्म सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे.

**गुन्हयाची माहिती**

१) **आयुक्तालय /पो.स्टे /गुरन /कलम-** औरंगाबाद शहर, जवाहरनगर पो.स्टे. गुरनं. ७४/२०१७, भादवि कलम ३६४-A,३०२,२०१,१२०B

२) **हकिगत** - १० वर्षीय वयाचा अजय (नांव बदललेले आहे.) बराच वेळ झाला घरी आला नाही. त्यावरुन तो मित्रांसोबत कॉलनीत खेळत असेल असे वाटल्याने अजयच्या आईने त्याचे एका मित्रास अजयला पाहण्यास सांगितले.अजयच्या मित्राने येवुन सांगीतले की, अजय हा दोन तीन मुलांसोबत कंपाऊडमध्ये उभा आहे. त्यानंतर एक-दीड तासानंतर देखील अजय घरी न आल्याने त्याची शोधाशोध सुरु केली. ज्या मुलांसोबत अजय होता त्यातील एक मुलगा अजयच्या घरी आला. त्याला अजयबाबत विचारले असता त्याने सांगितले की, एक तासापुर्वीच अजय घरी जातो असे म्हणुन निघुन गेला आहे त्यानंतर कोठे गेला हे माहित नाही. तेवढ्यात त्याच मुलाने अजयच्या घराचे मुख्य दरवाजाजवळुन एक चिठ्ठी उचलुन फिर्यादी यांच्या हातात दिली. चिठ्ठी वाचल्यानंतर थोडक्यात सारांश असा होता की, “पोलीसांना सांगितले तर मुलाला मारुन टाकण्यात येईल. पाच करोड रुपये नगर पुणे हायवे रोडवर सुवर्ण ज्योत ढाब्यासमोर स्माईल स्टोन हॉटेल समोर ,रोडवर पैसे टाकुन द्या पैसे टाकुन दिल्यावर मुलगा सुखरुप घरी येईल. ” असा मजकुर चिठ्ठीत असल्याने शेजारील राहाणारे व सोसायटीतील रहिवाशी यांनी शोधाशाध सुरु केली. घरात एवढी माणसे असताना सदर मुलास चिठ्ठी कशी काय मिळाली या संशयावरुन पोलीस स्टेशन येथे जाऊन घडला प्रकार सांगितला असता पोलीसांनी लगेच चिठठी मिळालेल्या मुलास ताब्यात घेतले . त्याच्याकडे विचारपुस करता मित्राच्या मदतीने खंडणीसाठी अजय यास किडनॅप करुन कारमध्ये पळवुन नेऊन एकाने गळा आवळुन व दुसऱ्याने तोंड दाबुन खुन केल्याची पोलीसांना कबुली दिल्याने नातेवाईकांनी दिलेल्या तक्रारीवरुन गुन्हा नोंद करण्यात आला.

३) **तपास** - तपास पथकाने आरोपी निष्पन्न करुन शास्त्रीय व तांत्रिक पुरावे गोळा केले. जप्त मुददेमालाची डीएनए चाचणी करुन घेण्यात आली. वेगवेगळया ठिकाणावरुन सीसीटीव्ही फुटेज हस्तगत करुन डिव्हीआर जप्त करण्यात आले. तांत्रिक पुराव्यांचे फॉरेन्सिक अहवाल प्राप्त करुन घेण्यात आले. घटनेचा रुट मॅप तयार करण्यात आला. सबळ पुरावा प्राप्त करुन मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. सदर गुन्हा सन-२०१७ मध्ये दाखल असुन डिसेंबर-२०१८ मध्ये मा.न्यायालयाने दाखल पुरावा ग्राहय धरुन दोन्ही आरोपींना आजन्म सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे.

४) **तपासी अधिकारी-**

१) पोनि/मनिष कल्याणकर
२) पोनि/ अविनाश आघाव
३) सपोनि/राहुल खटावकर
४) पोहवा/२३८/एस.आर.बडगुजर

वरील तपास पथकाने उल्लेखनीय तपास केल्याचे मा.न्यायालयाने निकालपत्रात नमुद केले आहे.